प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ११.०८.२०२१**

## महागृहनिर्माण योजना २०१८-१९ मधील अर्जदारांनी घरांचा ताबा देण्यासंदर्भात कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये, सिडकोचे आवाहन

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना २०१८-१९ यशस्वी अर्जदारांना १ जुलै २०२१ पासून घरांचा (सदनिकांचा) ताबा देण्याचा निर्णय सिडकोकडून यापूर्वीच घेण्यात आला असून या संदर्भात संबंधित अर्जदारांनी कोणत्याही भूलथापांना किंवा आमिषांना बळी पडू नये, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे. तसेच घरांचा ताबा देण्यासाठी सिडकोने कोणत्याही मध्यस्थ संस्था/व्यक्ती किंवा प्रतिनिधीची (एजंट) नियुक्ती केलेली नाही, असे स्पष्टीकरणही सिडकोकडून देण्यात आले आहे.

सिडकोने कोविड-१९ महासाथ व त्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, २०१८-१९ महागृहनिर्माण योजनेतील घरांचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण केले व १ जुलै २०२१ पासून यशस्वी अर्जदारांना टप्प्याटप्प्याने घरांचा ताबा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

घरांचा ताबा देण्यासंदर्भात कोणत्याही व्यक्तिने अथवा संस्थेने कोणत्याही प्रकारचे आमिष दाखवल्यास अर्जदारांनी त्यावर विश्वास ठेवू नये. कारण याकरिता कोणत्याही मध्यस्थ संस्था/व्यक्ती किंवा प्रतिनिधीची सिडकोकडून नियुक्ती करण्यात आलेली नाही. योजना पुस्तिकेमध्ये नमूद प्रक्रियेनुसारच घरांचा ताबा देण्यात येत आहे. या संदर्भातील माहितीकरिता अर्जदारांनी केवळ सिडकोचे अधिकृत संकेतस्थळ, सिडकोचे फेसबुक, युट्यूब व ट्विटर पेज, सिडकोकडून काढण्यात येणारी प्रसिद्धी पत्रके यांवरच विश्वास ठेवावा किंवा सिडको कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच या संदर्भात मध्यस्थ किंवा प्रतिनिधी म्हणवणाऱ्या कोणत्याही व्यक्ती वा संस्थेकडून अर्जदारांची फसवणूक झाल्यास सिडको जबाबदार राहणार नाही.

---

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

जनसंपर्क विभाग, सिडको